

रत्नागिरी नगर परिषदेतील शिवीगाळ प्रकरण तापले

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

रत्नागिरीचे ग्रामदैवत 'श्री देव भैरी'चा २ मार्चपासून शिमगोत्सव

पान ८



रत्नागिरी ● मंगळवार २४ फेब्रुवारी, २०२६ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक १०७ ● पाने ८ ● ₹ ५.०० www.prahaar.in epaper.prahaar.in

# राज्यात सहा महिन्यात तब्बल ९१ हजार ३३७ कोटींची गुंतवणूक

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांची अभिभाषणातून विधीमंडळात माहिती

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्राचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात १३.५ टक्क्यांहून अधिक वाटा असून, २०२४-२५ या वर्षात राज्याला १ लाख ६४ हजार ८७५ कोटींची थेट परकीय गुंतवणूक प्राप्त झाली. ही देशातील एकूण गुंतवणुकीच्या ३९ टक्के आहे. २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत ९१ हजार ३३७ कोटींची गुंतवणूक राज्यात आली, अशी माहिती राज्यपाल आचार्य देवव्रत



यांनी सोमवारी विधीमंडळात दिली.

विधिमंडळाच्या २०२६ या वर्षातील पहिल्या अधिवेशनाची सुरूवात राज्यपालांच्या अभिभाषणाद्वारे झाली. त्यावेळी राज्यपाल देवव्रत बोलत होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री आणि आमदार उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, राज्याची अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ५ ट्रिलीयन डॉलर्सपर्यंत वाढविण्यासाठी पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि जनकल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या २०२६ मधील दावोस येथील परिषदेत सुमारे ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ४० लाख रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे.

(पान २ वर)

### २६ लाख महिला बनल्या 'लखपती दीदी'

'उमेद' अभियानांतर्गत ६.६० लाख महिला बचतगटांना बँक कर्ज उपलब्ध झाले असून २६ लाखांहून अधिक महिला 'लखपती दीदी' बनल्या आहेत. आदिवासी महिलांसाठी 'राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना' जाहीर करण्यात आली. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठने कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्ससारख्या क्षेत्रात विस्तार केला आहे. डिप्लोमा अभ्यासक्रमांची १५४ विषयांची शैक्षणिक सामग्री मराठीत उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विशेष धोरण लागू करण्यात आले आहे. कर्करोग उपचारासाठी व्यापक कॅन्सर केअर धोरण राबविण्यात येत असून दुर्मीळ अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेण्यात

(पान २ वर)

# अजितदादा म्हणजे महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री!

## शोकप्रस्ताव मांडताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झाले भावूक

## दादांच्या जाण्याने 'पोकळी' शब्दाची खरी व्याख्या कळली

मुंबई (प्रतिनिधी)

'वक्तशीरपणा हा अंगभूत गुण असलेले अजित पवार कधीच वेळ चुकवत नसत. ते खूप मोठी इनिंग खेळतील, असे दिसत असताना, दादांनी पहिल्यांदाच आयुष्याचे टायमिंग चुकवले. दादा सहावेळा उपमुख्यमंत्री झाले, सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. अनेकवेळा ते म्हणायचे, मी कधीतरी मुख्यमंत्री होईन, पण उपमुख्यमंत्री म्हणून मी कायम राहीन. पण मी आज आवर्जून नमूद करेन, की 'अजितदादा पवार वॉज दी बेस्ट चिफ मिनिस्टर



महाराष्ट्र नेव्हर हॅड. अजितदादा म्हणजे महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री होते, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत आपल्या भावना व्यक्त केल्या.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्र्यांनी सोमवारी विधानसभेत शोकप्रस्ताव मांडला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री आणि आमदार उपस्थित होते. सभागृहाच्या गॅलरीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि अभिनेते सयाजी शिंदे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी माजी मंत्री सुरूपसिंग नाईक, माजी मंत्री डॉ. शालिनी पाटील, माजी राज्यमंत्री राज पुरोहित, आमदार गंगाधर पटने, निळकंठ फालक, विश्वास नांदेकर, रूपलेखा ढोरे यांच्या निधनाबद्दलही शोक व्यक्त करण्यात आला.

अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देत मुख्यमंत्री म्हणाले, 'अनेकदा ज्येष्ठ नेत्याच्या निधनानंतर आपण 'पोकळी निर्माण झाली' असे म्हणतो. पण दादांच्या जाण्याने या शब्दाची खरी व्याख्या कळली. अजित दादांसारखे दुसरे व्यक्तिमत्व होणे आता शक्य नाही. ते केवळ आमचे 'स्ट्रॅटेजिक पार्टनर' नव्हते, तर अंतःकरणापासून मित्रत्व जपणारे माझे मोठे भाऊ होते. आमचा दोघांचाही जन्म २२ जुलैचा, ते माझ्यापेक्षा ११ वर्षांनी मोठे असल्याने खऱ्या अर्थाने माझे 'दादा'च होते."

२०१९ च्या बहुचर्चित शपथविधीच्या आठवणी सांगताना फडणवीस म्हणाले, "२०१९ मध्ये

(पान २ वर)

## वेचक

### महाराष्ट्र भाजपकडून 'एसआयआर' समिती गठित

मुंबई (प्रतिनिधी): केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार यादीचा विशेष सखोल फेरनिरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम जाहीर केला असून, या प्रक्रियेचा राज्यभर प्रभावी पाठपुरावा करण्यासाठी भाजपने विशेष नियोजन केले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यासंदर्भात पक्षाची विशेष 'एसआयआर' समिती गठीत केली असून, यात अनुभवी नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या 'एसआयआर' कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करणे, दुबार नावे वगळणे आणि पात्र मतदारांची नोंदणी सुनिश्चित करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता राहावी आणि तांत्रिक बाबींची पूर्तता व्हावी, यासाठी भाजपच्या या समितीवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्षाच्या या महत्त्वाच्या समितीत

(पान २ वर)

### इराणमधून तत्काळ बाहेर पडा; भारत सरकारची नागरिकांना कडक सूचना

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी एक सूचना (ॲडव्हायजरी) जारी करून आपल्या नागरिकांना कोणत्याही मार्गाने तात्काळ इराणमधून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आहे.यापूर्वी १४ जानेवारीलाही मंत्रालयाने अशीच सूचना जारी करून सर्व नागरिकांना इराण सोडण्याचे आवाहन केले होते. मंत्रालयाने सूचनेत इराणमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांना सतर्क राहण्यास, आंदोलन किंवा निदर्शने होत असलेल्या ठिकाणी जाणे टाळण्यास आणि भारतीय दूतावासाशी सतत संपर्कात राहण्यास सांगितले आहे.तसेच नागरिकांनी आपले प्रवास व स्थलांतरासंबंधी कागदपत्रे - जसे

(पान २ वर)

## बावनदीच्या खोल डोहात काळाचा घाव

# हातखंब्यातील तरुणाचा दुर्दैवी अंत

### गावावर शोककळा

रत्नागिरी (वार्ताहर)

रत्नागिरी तालुक्यातील बावनदी परिसरात सोमवारी दुपारी घडलेल्या दुर्दैवी घटनेने हातखंबा गाव शोकसागरात बुडाले आहे. हातखंबा येथील ३५ वर्षीय सचिन सुरेश सनगरे (रा. सनगरेवाडी) यांचा नदीत बुडून मृत्यू झाला असून, या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास सचिन सनगरे आणि मिलिंद पांडुरंग सनगरे हे "गावात जातो" असे सांगून घराबाहेर पडले. प्रखर उन्हाचा तडाखा सहन न झाल्याने थंडावा मिळावा या उद्देशाने त्यांनी बावनदीकाठ गाठला. धरणाच्या खालच्या बाजूस, पुलाच्या वरच्या भागात असलेल्या खोल डोहात सचिन पोहण्यासाठी उतरले. मात्र पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अचूक अंदाज न आल्याने ते अचानक गटांगळ्या खात बुडू लागले.

ही धक्कादायक घटना लक्षात येताच मिलिंद सनगरे यांनी मदतीसाठी आर्त हाक दिली. त्यांच्या आरडाओरड्याने परिसरातील ग्रामस्थ तातडीने धावून आले. ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नांनंतर सचिन यांना पाण्यातून बाहेर काढण्यात आले आणि तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी तपासणी करून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र यादव यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सचिन सनगरे

(पान २ वर)

# राज्यातील २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका लांबणीवर

### आरक्षणाचा पेच कायम

## ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाचा 'ब्रेक'

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानुसार राज्यातील ५० टक्के आरक्षण



मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीत अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात अली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र आणि महाराष्ट्र सरकार या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने बांठिया समितीपूर्वीच्या स्थितीनुसार निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची ५० टक्क्यांची कायदेशीर मर्यादा ओलांडल्याने २२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत १२

(पान २ वर)

# यापुढे पक्षाशी दगाफटका करणाऱ्यांची गय केली जाणार नाही - ना.उदय सामंत

## जि.प. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, पं.स. सभापती, उपसभापती पदे सव्वा वर्षासाठी असणार

## मतदारांच्या चेहऱ्यावर ३६५ दिवस हास्य दिसले पाहिजे असे काम लोकप्रतिनिधींनी करावे

रत्नागिरी (वार्ताहर)

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये राज्याच्या तुलनेत रत्नागिरी जिल्ह्यामध्ये





(छाया : प्रशांत हरचेकर)

सर्वाधिक उमेदवार शिवसेनेचे विजयी झाले आहेत. हा शिवसेना कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा विजय आहे. आता विजयी झालेल्या उमेदवारांनी आपल्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना वाऱ्यावर सोडू नका, नाहीतर कोणाची गय केली जाणार नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आपल्या काही लोकांनी विरोधकांशी मैत्री जपली, त्याचा मोठा फटका संगमेश्वरमध्ये बसला आहे. यापुढे पक्षाशी दगाफटका करणाऱ्यांची गय केली जाणार नाही असा इशारा राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री व रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी दिला.

शहरातील जयेश मंगल पार्क येथे शिवसेनेच्या चिन्हावर विजयी

(पान २ वर)

## रत्नागिरी सत्र न्यायालयाचा निकाल

# लांजा येथील शाळकरी मुलीवरील अत्याचार प्रकरणात नराधमाला जन्मठेप

रत्नागिरी (वार्ताहर)

लांजा येथे ११ वर्षीय शाळकरी मुलीवर झालेल्या संतापजनक अत्याचार प्रकरणात आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावून रत्नागिरी सत्र न्यायालयाने मोठी भूमिका घेतली आहे. या निकालामुळे जिल्ह्यात समाधानाची भावना व्यक्त होत असून बालकांवरील अत्याचार प्रकरणांत न्यायालयाचा ठाम संदेश अधोरेखित झाला आहे.

११ जुलै २०२३ रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास ही घटना लांजा येथे घडली होती. पीडित मुलगी शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना आरोपी आशितोष अनिल जाधव (वय २०, रा. लांजा) याने तिच्यासोबत असलेल्या दोन मुलांना धमकावून दूर पाठवले. त्यानंतर मुलीला जबरदस्तीने जवळील शासकीय उपकेंद्राच्या मागील बाजूस नेऊन तिच्यावर अत्याचार केला. घडलेला प्रकार कुणाला सांगितल्यास ठार मारण्याची धमकीही आरोपीने दिली होती.

घरी परतल्यानंतर मुलगी घाबरलेल्या अवस्थेत असल्याचे पालकांच्या लक्षात आले. नातेवाईकांनी विचारपूस केल्यानंतर तिने संपूर्ण घटना सांगितली. यानंतर तिच्या आईने लांजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (ए)(बी), ५०४, ५०६

(पान २ वर)

# टॅक्सीचालक बनणार मालक ! ५०० रुपयांची गुंतवणूक करा

## अमित शाह यांचा भारत टॅक्सी चालकांशी संवाद

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)





ड्रायव्हर आता मालक बनू शकतो. सुरूवातीला ५०० रूपये गुंतवून तुम्ही मालक बनू शकता, असे केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी टॅक्सी चालकांशी संवाद सांगताना एक योजना सादर केली.

अमित शाह यांनी दिल्लीतील भारत टॅक्सी चालकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सांगितले की, सहकारी क्षेत्र हे सरकारसाठी सर्वोच्च प्राधान्य आहे. ५ फेब्रुवारी रोजी अमित शाह यांनी दिल्ली येथे भारतातील पहिला सहकारी-आधारित राइड-हेलिंग प्लॅटफॉर्म, भारत टॅक्सी लॉंच केला. हा देशातील पहिला सहकारी टॅक्सी सेवा प्रकल्प आहे, ज्याचा उद्देश चालकांना थेट फायदा पोहोचवणे आहे.

कार्यक्रमादरम्यान, अमित शाह यांनी भारत टॅक्सी चालकांशी मोकळेपणाने संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, सहकारी क्षेत्राला बळकट करणे ही आमच्या सरकारची प्राथमिकता आहे. अमित शाह म्हणाले, "जर तुम्ही सहकार्याचं तत्त्वज्ञान आणि पद्धती योग्यरित्या समजून घेतल्या तर, प्रश्न उद्‌भवणार नाहीत. सहकार्य म्हणजे एकत्र काम करणे आणि एकत्र नफा मिळवणे.

(पान २ वर)

# दहशतवादावर भारताचा जोरदार 'प्रहार' !

## देशाचे पहिले दहशतवादविरोधी धोरण जाहीर; दहशतवादाविरोधात सात कलमी रणनीती

### सायबर सुरक्षा आणि तंत्रज्ञानावर देणार भर

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेला असलेल्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी केंद्र सरकारने सोमवारी प्रहार या नावाखाली भारताचे पहिले अधिकृत दहशतवादविरोधी धोरण जाहीर केले.झिरो टॉलरन्स म्हणजेच दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता हे या धोरणाचे मुख्य सूत्र असून, गुप्तचर यंत्रणांवर आधारित प्रतिबंधात्मक कारवाई आणि दहशतवाद्यांच्या आर्थिक रसद पुरवठ्यावर पूर्णपणे टाच आणणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

गृह मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या या ऐतिहासिक दस्तऐवजात दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी सात प्रमुख स्तंभांवर आधारित बहुस्तरीय रणनीती मांडण्यात आली आहे. या धोरणामध्ये दहशतवाद रोखणे, तत्काळ प्रतिसाद देणे, अंतर्गत क्षमतांचे एकत्रीकरण, मानवी हक्क आणि कायद्याचे राज्य, दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या परिस्थितीचे निर्मूलन, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्नांची सांगड घालणे आणि संपूर्ण समाजाच्या सहभागातून पुनर्वसन व लवचिकता निर्माण करणे या बाबींवर भर दिला आहे.

शेजारील देशांमधील अस्थिरतेचा फायदा घेऊन काही देश दहशतवादाचा वापर सरकारी धोरणाचे साधन म्हणून करत असल्याचा उल्लेख करत, भारताने कोणत्याही विशिष्ट धर्माशी किंवा वांशिकतेशी दहशतवादाचा संबंध जोडण्यास स्पष्ट नकार दिला आहे. धोरणानुसार, केवळ लष्करी किंवा तांत्रिक कारवाईवर अवलंबून न राहता गरिबी आणि बेरोजगारी

(पान २ वर)

# सीसीटीव्ही बंद आढळल्यास केंद्र संचालकांसह प्राचार्य अन् समन्वयकावर होणार कारवाई

## पेपर फुटीवर शिक्षण मंडळाचा मोठा निर्णय

मुंबई (वृत्तसंस्था)


बारावीचे भौतिकशास्त्र व रसायनशास्त्राचे दोन पेपर फुटल्यानंतर महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा पूर्णवेळ कार्यान्वित ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यात फुटेजमध्ये काही गडबड आढळल्यास संबंधित केंद्र संचालकांसह इतर अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.


नागपूर येथील एका परीक्षा केंद्रावर बारावीचे फिजिक्स व केमेस्ट्री हे दोन पेपर फुटले होते. यामुळे परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात घेण्याच्या बोर्डाच्या तयारीचा फज्जा उडाला होता. या प्रकारामुळे राज्यभरात खळबळ माजली असताना आता बोर्डाने असे प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्हींच्या बाबतीत अधिक कठोर निर्णय घेतला आहे. बोर्डाच्या निर्णयानुसार, दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व कॉपीसारख्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सर्वच परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही


(पान २ वर)


## पक्षी निरीक्षणाने पक्षी मित्र संमेलन २०२६ची सांगता

# हळद्या, निलकर्ण खंड्या, तांबट, वन घुबड जोडीच्या दर्शनाने पक्षी निरीक्षक सुखावले









रत्नागिरी (वार्ताहर)

वेळ सकाळी सात साडेसात..स्थळ पोमेंडीची देवराई..पक्ष्यांच्या सुरेल आवाजाने स्वागत..पक्षी निरीक्षकांचे डोळे, दुर्बिणी, मोबाईल आणि कॅमेराच्या गन क्षणार्धात झाडांच्या शेंड्यांवर सुरांकडे स्थिरावल्या. हळद्या, निलकर्ण खंड्या, तपकिरी डोक्याचा तांबट आणि वन घुबडाच्या जोडीच्या दर्शनाने पक्षी निरीक्षक सुखावून गेले.

वन विभाग आयोजित पक्षी मित्र संमेलन २०२६ची सांगता थेट क्षेत्रीय स्तरावरील भेटीने आणि पक्षी निरीक्षणाने आज झाली. सह्याद्री संकल्प सोसायटीचे कार्यकारी संचालक प्रतीक मोरे, पक्षी मित्र विराज आठल्ये, निकिता शिंदे यांच्यासह राज्यभरातून आलेले पक्षी मित्र, पक्षी निरीक्षक आज एकत्रितपणे पक्षी निरीक्षण, जंगल वाचनाचा आनंद घेत होते. सकाळी सात, साडेसात वाजता पोमेंडी येथील देवराईत सर्वजण पोहचले. या सर्वांचे स्वागतच पक्ष्यांच्या सुरेल आवाजाने जणू झाले. काजरा या वृक्षाची माहिती श्री. मोरे यांनी सर्वांना दिली. समोरच मलबार

(पान २ वर)